| | |
|---|---|
| MHND060000082026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२/२०२६**<br>**बालाजी किशनराव डाकोरे व ईतर वि. निरंक.** |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ मुलगा, अर्जदार क्र.२ ते ४ या **मयत महादाबाई किशनराव डाकोरे** यांची मुली आहेत. मयत **मयत महादाबाई किशनराव डाकोरे** यांचा **दि.१८/०९/२०२५** रोजी मृत्यु झाला आहे. मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचे पती व अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील किशन दत्ता डाकोरे यांचा १४/०८/२००२ रोजी मृत्यू झालेला आहे.

३. मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांच्या निधनानंतर त्यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही कायदेशीर वारस नसल्याने व त्यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी सदरचा अर्ज मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्याकरिता केलेला आहे.

४. अर्जदार क्र. १ ते ४ हेच मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचे वारस असल्याचे सिद्ध करणेकरिता त्यांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचा मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.६/१** |
| २. | मयत किशन दत्ता डाकोरे यांचा मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.६/२** |

| | | |
|---|---|---|
| ३. | पोलीस पाटील हिप्परगामाळ, ता.बिलोली, जि.नांदेड यांनी अर्जदार क्र.१ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबतचा दिलेला वारसा प्रमाणपत्र. | **नि.क्र.६/३** |
| ४. | अर्जदार क्र.१ ते ४ यांचे आधार कार्डाच्या पडताळणी केलेल्या प्रती | **नि.क्र.६/४, ६/५, ६/६ व ६/७.** |
| ५. | मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचा आधार कार्डाची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.६/८** |
| ६. | दिनांक १४.०१.२०२६ रोजीचे दैनिक 'श्रमिक एकजुट' या वृत्तपत्रातील जाहीर प्रगटन | **नि.क्र.१० खाली** |

५. अर्जदारांतर्फे साक्षीदार रुक्मीनबाई सुंगधराव कदम यांचा साक्षी पुरावा **नि.क्र.१२** वर दाखल केला आहे. तसेच, अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरसिस **नि.क्र.१३** वर दाखल करण्यात आली. अर्जदाराच्या विधिज्ञांचा युक्तीवाद विस्तृतपणे ऐकण्यात आला.

६. नि.क्र.१ वरील आदेशाव्दारे सर्व सामान्यांकडुन हरकत आक्षेप नोंदविण्याकरिता जाहीर प्रगटन दैनिक 'श्रमिक एकजुट' या वृत्तपत्राचे दिनांक १४.०१.२०२६ च्या आवृत्तीमध्ये प्रसिद्ध करण्यात आले. विहीत मुदतीत अर्जदाराने दाखल केलेल्या सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुत अर्ज निर्वीवादीत राहीला.

७. साक्षीदार रुक्मीनबाई सुंगधराव कदम यांनी त्याच्या **नि.क्र.१२** वरील साक्षीपुराव्यात अर्जातील विवाद कथनांचा हुबेहुब उहापोह केला व पुराव्यामध्ये मयताशी नाते संबंध आणि वारस असल्याचा दर्जा प्रर्कषाने उदघृत केला आहे. साक्षीदार यांच्या पुराव्यातील विधानांचे कोणत्याही प्रकारे खंडण झालेले नाही. मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांच्या मृत्युची सिध्दता मृत्युप्रमाणपत्रा अन्वये सिद्ध होत आहे. मयत महादाबाई

किशनराव डाकोरे यांचा अर्जदार क्र.१ हा मुलगा व अर्जदार क्र.२ ते ४ या मुली आहेत. यावरुन मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणतेही वारस नाहीत हे स्पष्ट होत आहे. खंडणाअभावी दाखल पुराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायद्यातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत महादाबाई किशनराव डाकोरे यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरले आहेत. परिणामतः निम्नलिखित आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ४ यांना **मयत महादाबाई किशनराव डाकोरे** यांचे वारस म्हणुन घोषित करण्यात येत आहे. |
| ३ | अर्जदार यांच्याकडुन नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरुन बॉम्बे रेग्युलेशनचे पुरवणी ब मधील विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR

Digitally signed by DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR
Date: 2026.07.30 16:13:20 +0530

दिनांकः ३०.०७.२०२६

**(ज्ञा. सु. निंबाळकर)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.K. Mohammad, Grade - III |
| Name of court | : | Jt. CJJD & JMFC, Biloli. |
| Judgment dictated on | : | 30.07.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 30.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 30.07.2026 |